महाराष्ट्र शासन
**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे ६७.
**COMMISSIONERATE OF ANIMAL HUSBANDRY**
स्पायसर मेमोरिअल कॉलेज समोर, औंध, पुणे ४११ ०६७.
**Maharashtra State, Opposite Spicer Memorial College, Aundh, Pune 411067**
**E-Mail :** cah.diseasecontrol@gmail.com
**Telephone No.-020-25690480; 81; 85**
**Extn. 239,240,241,242,243,244**
*"पशुधनाच्या आजारावर घरपोच उपचार, एका कॉलच्या अंतरावर ; संपर्क टोल फ्री क्रमांक - १९६२"*

---

जा.क्र. MVU/सेनिपवैअ/२७४/ २८७२-२९४७/२०२५ पसं-१२, औंध, पुणे- ६७, दि.०६/०६/२०२५

**तात्काळ**

प्रति,

जिल्हा पशुसवंर्धन उपआयुक्त (सर्व)

**विषय:-** मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेअंतर्गत फिरते पशुचिकित्सा पथकांसाठी सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची ठराविक कालावधीकरिता मानधन तत्वावर नियुक्तीसाठी अर्ज सादर करणेबाबत...

**संदर्भ :-** १. शासन निर्णय क्र. पविआ-१०१७/प्र.क्र.८७/पदुम-३, मुंबई-३२ दि. २५.०२.२०१९.
२. सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ मुंबई-३२ दि.१७.१२.२०१६.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००(भाग-१)/१३ मुंबई-३२ दि.०८.०९.२०२३.
४. सामान्य प्रशासन विभाग शा.नि. क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००(भाग१)/आरस्थामं(का.१३) मुंबई-३२, दि.२३.०९.२०२४

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने राज्यामध्ये मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेअंतर्गत ७३ फिरते पशुचिकित्सा पथके कार्यरत आहेत. संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.६ (१) कर्मचारी वृदांची नियुक्ती यामध्ये नमुद केल्यानुसार ठराविक कालावधीसाठी पशुचिकित्सा पथकांसाठी पशुवैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी उपलब्ध मनुष्यबळातुन नियुक्त करण्यास तसेच उपलब्ध मनुष्यबळ कमी असल्यास, ठराविक कालावधीसाठी सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी/ कर्मचारी यांची प्रचलित धोरणानुसार मानधन तत्वावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीत सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा उपलब्ध न झालेल्या पथकांवर क्षेत्रीय स्तरावर उपलब्ध असलेल्या पशुधन विकास अधिकारी यांना अतिरिक्त कार्यभार देऊन सदर फिरत्या पशुचिकित्सा पथकांमार्फत पशुआरोग्य विषयक सेवा पुरविण्यात येत आहेत. सदर पथकांचे कामकाज अधिक प्रभावीपणे होण्यासाठी संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या सेवा उपलब्ध करुन घेणे गरजेचे असल्याने संदर्भ क्र.२ ते ४ वरील शासन निर्णयातील तरतुदी अनुषंगाने विविक्षित कामांसाठी पात्र सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून सद्यस्थितीत रिक्त असलेल्या तसेच नामिकासूचीस ३ वर्ष पूर्ण होत असलेनुसार माहे जुलै-२०२५ नंतर

विविध टप्प्यात रिक्त होणाऱ्या फिरत्या पथकांवरील सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी पदासाठी **दि.१३.०६.२०२५** अखेर कार्यालयीन वेळेपर्यंत अर्ज मागवण्यात येत आहेत.

याअनुषंगाने मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेअंतर्गत **सद्यस्थितीत रिक्त तसेच जुलै-२०२५ नंतर विविध टप्प्यात रिक्त** होणाऱ्या फिरत्या पशुचिकित्सा पथकांची यादी, अर्जाचा नमुना, प्रतिज्ञापत्र, कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोबत जोडण्यात आलेले आहे. याबाबत आपल्या जिल्ह्यामधून सेवानिवृत्त झालेल्या व संदर्भ क्र.२ वरील शासन निर्णयातील नमूद अटींनुसार मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेअंतर्गत फिरत्या पशुचिकित्सा पथकांवर काम करण्यास पात्र व इच्छुक नोंदणीकृत **६५ वर्षाखालील** सेवानिवृत्त पशुवैद्यकांकडून **(सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व पशुधन विकास अधिकारी गट-अ संवर्ग)** अर्ज प्राप्त करुन घेऊन आपल्या शिफारशीसह **दि.१३.०६.२०२५ अखेर** खात्यास प्राधान्याने सादर करावेत.

**सोबत:-** १. संदर्भ क्र.१ व २ वरील शासन निर्णयाची प्रत.
२. रिक्त फिरत्या पथकांची यादी.
३. अर्जाचा विहित नमुना, प्रतिज्ञापत्र, कर्तव्ये व जबाबदाऱ्या.

**(मा.आयुक्त पशुसंवर्धन महोदय यांचे मान्यतेने)**

(डॉ. अंकुश परिहार)
उपआयुक्त पशुसंवर्धन (रोगनियंत्रण)
पशुसंवर्धन आयुक्तालय, औंध, पुणे-६७.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी -
१. प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, सर्व विभाग.
२. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.

# मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना अंतर्गत रिक्त पथकांचा तपशील

| विभाग | जिल्हा | रिक्त फिरते पशुचिकित्सा पथके |
|---|---|---|
| मुंबई | मुंबई | आरे मुंबई |
| | पालघर | मोखाडा, वाडा |
| | रायगड | श्रीवर्धन, माणगांव. |
| | रत्नागिरी | मंडनगड |
| | सिंधुदुर्ग | दोडामार्ग |
| | **एकूण** | ७ |
| पुणे | पुणे | बारामती, पुरंदर |
| | सातारा | कराड, खटाव (वडूज) |
| | सांगली | कवठेमहांकाळ, जत, कडेगांव |
| | कोल्हापूर | कागल, हातकणंगले, पन्हाळा |
| | सोलापूर | सांगोला, माढा |
| | **एकूण** | १२ |
| नाशिक | नाशिक | इगतपूरी. |
| | अहिल्यानगर | कर्जत, नेवासा, संगमनेर, श्रीरामपूर |
| | नंदुरबार | नवापूर, अक्कलकुवा |
| | जळगांव | रावेर |
| | धुळे | धुळे. |
| | **एकूण** | ९ |
| छत्रपती संभाजीनगर | परभणी | परभणी |
| | जालना | जालना, घनसावंगी. |
| | बीड | वडवणी |
| | **एकूण** | ४ |
| लातूर | लातूर | देवणी |
| | नांदेड | देगलुर. |
| | धाराशिव | कळंब |
| | **एकूण** | ३ |
| नागपूर | नागपूर | रामटेक, उमरेड, सावनेर |
| | भंडारा | पवनी, मोहाडी |
| | गडचिरोली | एटापल्ली, कोरची. |
| | चंद्रपूर | मूल, भद्रावती, राजूरा, सिंदेवाही |
| | गोंदिया | सालेकसा |
| | **एकूण** | १२ |
| अमरावती | अमरावती | अचलपूर, अंजनगाव सुर्जी |
| | वाशिम | रिसोड |
| | बुलढाणा | सिंदखेडराजा. |
| | **एकूण** | ४ |
| | | ५१ |

# मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजने अंतर्गत सेवा निवृत्त अधिकारी यांची मानधन तत्वावर नियुक्ती होणेबाबत.

## अर्जाचा नमुना

अर्जदाराचा
फोटो

| | | |
|---|---|---|
| उमेदवाराचे नाव | :- | |
| लिंग | :- | |
| कायमचा पत्ता | :- | |
| पत्रव्यवहाराचा पत्ता | :- | |
| भ्रमणध्वनी क्रमांक | :- | |
| ई - मेल आयडी | :- | |
| जन्म तारीख<br>(१० वी/ माध्यमिक शालांत परिक्षा/पदवी प्रमाणपत्र जोडावे) | :- | |
| वय<br>(दि.०१/०८/२०२५ रोजीचे वय) | :- | वर्ष व महिने |
| शैक्षणिक अर्हता | :- | |
| महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकिय परिषद यांचे कडील नोंदणी क्रमांक व वैधता दिनांक | :- | नोंदणी क्रमांक -<br>वैधता दिनांक - |
| शारीरीक अपंग:-<br>आहे/ नाही.<br>(असल्यास अपंगत्वाचा प्रकार--------) | :- | |
| सेवानिवृत्तीचा दिनांक | :- | |
| सेवानिवृत्तीचे ठिकाण व पद | :- | |
| सेवानिवृत्ती पूर्वीचे शेवटचे वेतन | :- | |
| सेवानिवृत्ती वेतनाचे अंशराशीकृत मूल्य | :- | |
| सेवानिवृत्ती वेतन | :- | |

(कृ.मा.प)

नियुक्तीसाठी प्राधान्यक्रमाने जिल्हा व त्यातील फिरते पशुचिकित्सा पथकांची प्राधान्यक्रमाने नावे :-

| अ. क्र. | प्राधान्यक्रमाने जिल्हा | फिरते पशुचिकित्सा पथकांचे प्राधान्यक्रम |
|---|---|---|
| १. | | |
| २. | | |
| ३. | | |
| ४. | | |
| ५. | | |

अटि-

१. सेवानिवृत्तीचे सुधारित पेन्शन पेमेंट ऑर्डर/महालेखापाल यांचे कडून प्राप्त झालेले प्राधिकापत्र सोबत जोडणे बंधनकारक राहील.

२. आपल्याविरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई प्रस्तावित किंवा प्रलंबित आहे काय? असल्यास त्याबाबतचे विवरण नमूद करणे बंधनकारक राहील.

३. आपल्याविरुध्द कोणत्याही फौजदारी प्रकारचे न्यायालयीन प्रकरण कोणत्याही न्यायालयात प्रलंबित आहे किंवा कसे? किंवा आपल्याला फौजदारी प्रकारची शिक्षा झाली आहे किंवा कसे? याबाबतचे विवरण नमूद करणे बंधनकारक राहील.

४. आपल्याला सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा दुसरा लाभ मिळाला आहे किंवा कसे ? त्याअनुषंगाने आपली सेवानिवृत्ती वेतननिश्चिती झाली आहे किंवा कसे? याबाबतचे विवरण जोडणे बंधनकारक राहील.

५. महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकिय परिषद यांचे कडील नोंदणी क्रमांक व वैध असलेले प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील.

६. एका पथकासाठी एका पेक्षा जास्त अधिकाऱ्यांचा प्राधान्यक्रम आल्यास सर्वात कमी वय असणाऱ्या अधिकाऱ्याचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

७. शासनमान्य नामिकासूचीनुसार सोबत रिक्त असलेल्या फिरत्या पशुचिकित्सा पथकांची नावे दिली असून त्या ठिकाणी मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात येईल व ज्या पदावर सध्या सेवानिवृत्त अधिकारी मानधन तत्वावर काम करत आहेत ती पदे भविष्यात जशी रिक्त होतील त्या पदावर मानधन तत्वावर नियुक्ती करण्यात येईल.

८. फिरत्या पशुचिकित्सा पथक वाहनाची देखभाल दुरुस्ती तसेच वाहनाचा विमा ह्याबाबत जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचेशी समन्वय ठेऊन त्यानुसार पथक प्रभावीपणे कार्यरत राहील याची जबाबदारी पथकप्रमुख म्हणून सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी यांची असेल.

९. सोबत सद्यस्थितीत रिक्त व माहे जुलै-२०२५ नंतर विविध टप्प्यात रिक्त होणाऱ्या ५१ पथकांची यादी सोबत जोडली आहे.

मी जाहिर करतो की, वरील प्रमाणे सादर करण्यात आलेली माहिती बरोबर आहे. त्यामध्ये काही तफावत आढळल्यास त्याची सर्व जबाबदारी माझी राहील. प्राधान्यक्रम दिलेल्या पथकांव्यतिरिक्त इतर पथकांवर नियुक्ती झाल्यास मी काम करण्यास तयार आहे.

अर्जदाराची स्वाक्षरी

नाव

दिनांक

# प्रतिज्ञापत्र

मी डॉ. ................................................रा......................ता....................
जि................. प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, उपरोक्त अर्जात नमुद माहिती माझ्या माहितीप्रमाणे बिनचूक व खरी आहे. माहितीमध्ये तफावत आढळल्यास नामिकासूची मधून माझी शिफारस रद्द होऊ शकते तसेच प्रचलित कायदा/नियमानुसार मी शिक्षेस/कारवाईस पात्र ठरेन याची मला जाणीव आहे.

सदरची नेमणूक मानधन तत्त्वावर (करार पध्दतीने) विविक्षित कामासाठी असल्याने माझ्या वारसाला शासकीय सेवेच्या अनुषंगाने कोणताही हक्क सांगता येणार नाही हे मला ज्ञात आहे. मी कोणत्याची राजकीय पक्षाशी संबधीत नाही. माझ्यावर कोणत्याही प्रकारचा फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल नाही किंवा मला कोणत्याही गुन्ह्यामध्ये शिक्षा झालेली नाही. तसेच शिस्तभंगविषयक कोणत्याही प्रकारची कारवाई माझ्यावर झालेली नाही अथवा प्रलंबित नाही.

मी दिलेल्या प्राधान्यक्रमा व्यतिरिक्त इतर फिरत्या पशुचिकित्सा पथकावर माझी नेमणूक झाल्यास त्याचा स्वीकार करण्याची माझी तयारी आहे. फिरत्या पशुचिकित्सा पथकावर रुजू झाल्यानंतर राजीनामा देण्यासाठी किमान एक महिना अगोदर कल्पना द्यावी लागेल हे मला ज्ञात आहे.

ठिकाण-
दिनांक-

(स्वाक्षरी)
उमेदवाराचे नाव

# पशुवैद्यकीय अधिकारी यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या

१) फिरत्या पशुवैदयकीय दवाखान्याच्या संचाचे (बेसीक केअर) नेतृत्व करणे.

२) आजारी असलेल्या पशुंवर प्रथमोपचार देणे.

३) आजारी पशुंवर आवश्यक उपचार करणे.

४) भेट आणि देखभाल केलेल्या पशुधनाची व्हेटरीनरी केअर रेकॉर्डस फॉर्ममध्ये दस्तावेजी करणे, केल्याची खात्री करणे.

५) उपकरणांची देखभाल, फिरत्या दवाखान्याची स्वच्छता याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे.

६) औषधांच्या साठ्याची नोंद ठेवणे.

७) **मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना** या योजनेच्या अनुषंगाने नियंत्रण अधिकाऱ्यांद्वारे वेळोवेळी सोपविण्यात येणाऱ्या सर्व जवाबदाऱ्या पार पाडणे.

**<u>मुख्यमंत्री पशुस्वास्थ योजना</u>**
**पशुपालकांच्या दारापर्यंत पशुआरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यात फिरते पशुचिकित्सा पथक सुरू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक- पविआ -१०१७/प्र.क्र.८७/पदुम-३**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दिनांक:- २५ फेब्रुवारी, २०१९**

**<u>प्रस्तावना :-</u>**

मा. मंत्री (वित्त) यांनी सन २०१७ च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये "पशुपालकांच्या दारापर्यंत पशुआरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यात ३४९ फिरत्या पशुवैद्यकीय चिकित्सालयाची स्थापना करण्याची" ही नवीन योजना सुरू करण्याची घोषणा केली होती.

२. राज्यातील पशुधनास कृत्रिम रेतन, औषधोपचार, लसीकरण, शस्त्रक्रिया, वंध्यत्व तपासणी, गर्भधारणा तपासणी, इत्यादी प्रकारच्या पशुआरोग्य सेवा पशुवैद्यकीय संस्थामार्फत नियमितपणे पुरविल्या जातात. तथापि, पशुधन आजारी पडल्यास सदर पशुधनास नजीकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यांमध्ये घेऊन जावे लागते. पशुरूग्ण जर चालण्यास सक्षम नसेल तर पशुपालकांना वाहनाची सोय स्वखर्चाने करावी लागते. बहुतांशी पशुपालकांना हा आर्थिक भार परवडणारा नसतो. त्यामुळे पशुवैद्यकीय सेवेअभावी पशुरुग्णांचा मृत्यू होऊन, पशुपालकांचे आर्थिक नुकसान होते. राज्यातील पशुधनाची उत्पादन क्षमता वाढविण्यासाठी त्यांचे आरोग्य उत्तम असणे गरजेचे आहे व त्याकरीता उत्कृष्ठ दर्जाच्या पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. सबब, राज्यातील दुर्गम, डोंगराळ, आदिवासी बहुल भागामध्ये तसेच ज्या भागामध्ये पशुधनाच्या तुलनेत पशुवैद्यकीय दवाखान्याची संख्या कमी आहे, त्याचप्रमाणे ज्या भागामध्ये दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधा आहेत, अशा तालुक्यांमधील पशुरुग्णांना पशुवैद्यकीय सेवा पशुपालकांच्या दारापर्यंत पोहचविण्यासाठी, फिरते पशुचिकित्सा पथक स्थापन करणे आवश्यक आहे.

३. वरील बाबींचा विचार करुन राज्यातील ३४९ ग्रामीण तालुक्यांमध्ये स्थापन करावयाच्या फिरत्या पशुचिकित्सा पथकांपैकी प्रथम टप्प्यात ८० तालुक्यांमध्ये नवीन ८० फिरती पशुचिकित्सा पथके स्थापन करण्यास, तसेच सदर फिरत्या पशुचिकित्सा पथकांच्या कामाचा सर्वकष अभ्यास करुन फलनिष्पत्ती विचारात घेवून, उर्वरीत तालुक्यांमध्ये फिरते पशुचिकित्सा पथके निर्माण करण्याचा निर्णय पुढील टप्प्यात घेण्यास मंत्रिमंडळाने दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे

४. वर नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, पशुपालकांच्या दारापर्यंत पशुरुग्णांना पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी, राज्यात प्रथम टप्प्यात ८० फिरत्या पशुचिकित्सा पथकाची स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

५. राज्यात सद्या कार्यरत असलेल्या ६५ फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्या व्यतिरीक्त **मुख्यमंत्री पशुस्वास्थ योजना** या राज्यस्तरीय योजनेंतर्गत सोबत जोडलेल्या **परिशिष्ट - अ** मध्ये नमूद केलेल्या ८० तालुक्यांमध्ये नवीन फिरते पशुचिकित्सा पथक स्थापन करण्यास याद्वारे खालीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे:-

**(अ) योजनेचे स्वरुप:-**

(१) सदर योजनेअंतर्गत फिरत्या पशुचिकित्सा पथकामध्ये उपकरणांनी सुसज्ज वाहन तसेच **पशुवैद्यकीय अधिकारी** किंवा **कर्मचारी** आणि **वाहन चालक *तथा* मदतनीस (Driver *cum* Helper)** यांचा समावेश असेल.

(२) या पथकाकरीता आवश्यक असणारी औषधे, हत्यारे व उपकरणे इत्यादी बाबी साठींचा निधी सद्या कार्यरत असलेल्या फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांकरीता मंजूर असलेल्या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल.

(३) तसेच सदर पथकाच्या वाहनासाठी आवश्यक असलेले इंधन, वाहन दुरूस्ती व देखभाल इत्यादी बाबींसाठी येणाऱ्या खर्चाकरीता आवश्यक असलेला निधी सध्या कार्यरत असलेल्या फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांकरीता मंजूर असलेल्या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करुन देण्यात येईल.

(४) फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांची सेवा परिणामकारकरित्या उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने टोल फ्री क्रमांकाची सुविधा, ॲन्ड्रॉइड ॲप (कॉल सेंटर सुविधासह) उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी करावी.

**(ब) पशुवैद्यकीय सेवांचा तपशील.**

सदर योजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या पशुवैद्यकीय सेवांचा तपशील सोबतच्या **परिशिष्ट-ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे राहील.

**(क) पशुवैद्यकीय अधिकारी / कर्मचारी तसेच वाहनचालक *तथा* मदतनीस यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या.**

सदर फिरत्या पशुचिकित्सा पथकासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या पशुवैद्यकीय अधिकारी / कर्मचारी तसेच वाहनचालक तथा मदतनीस यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या सोबतच्या **परिशिष्ट-क** मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील.

**(ड) उपकरणे:-**

सदर पथकाच्या वाहनांमध्ये प्रामुख्याने खाली नमूद केलेली उपकरणे राहतील:-

(१) कास्टींग उपकरणे - पशुधनाचे पाय बांधण्यासाठी दोरी, तोंड व जबडा बांधण्याचे कपडे, पशुधनास पकडण्यासाठी जाळी. बसलेले जनावर उभे करण्यासाठी ट्रस ॲण्ड चेन पुली. (२) आय/व्ही कॅन्यूला आय/ व्ही कॅथेटर

(३) तात्पुरता अस्थीभंग स्थिर करण्यासाठी विविध उपकरणे स्प्लींट

(४) शस्त्रक्रिया आणि इतर कार्यपध्दतीसाठी वेदनाशमक व इतर औषधे झायलेझाईन, केटामाईन, प्रोप्रोफोल, डायझेपाम, डोक्साप्रॅम, योहीम्बीन, ॲटोपीन सल्फेट, सोडियम

थायोसल्फेट, इंजेक्शान अर्गोमेट्रिन, इंजेक्शान पाम (PAM), इंजेक्शान कॅल्शियम ग्लुकोनेट, ॲक्टीव्हेटेड चारकोल, इंजेक्शान बेरेनिल, बी.पी. हँडल, सर्जिकल ब्लेड, क्रोमिक कॅटगट, नायलॉन, सुचरींग निडल्स, स्ट्रेट + कर्व्हड, निडल होल्डर, पोव्हिडोज आयोडीन, अबझॉरबंट कॉटन.

**६. कर्मचारीवृंदांची नियुक्ती.**

(१) सदर पशुचिकित्सा पथकांसाठी पशुवैद्यकीय अधिकारी / कर्मचारी उपलब्ध मनुष्यबळातून नियुक्त करण्यास तसेच उपलब्ध मनुष्यबळ कमी असल्यास, ठराविक कालावधीसाठी सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांची प्रचलीत धोरणानुसार मानधन तत्वावर नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(२) सदर पशुचिकित्सा पथकांसाठी वाहन चालक *तथा* मदतनीस ही पदे रु. १५०००/- प्रति कर्मचारी-प्रति माह एवढ्या एकत्रित वेतनावर प्रचलीत धोरणानुसार बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**७. आवश्यक वाहने व उपकरण खरेदी आणि फॅब्रीकेशनसाठी तसेच मनुष्यबळावरील खर्चाची तरतूद.**

(१) सदर पशुचिकित्सा पथकांसाठी उपकरणे व फॅब्रीकेशनसह वाहन खरेदी करण्यासाठी प्रति वाहन अंदाजे रु. १६.०० लक्ष, याप्रमाणे ८० वाहनांसाठी रु. १२.८० कोटी एवढ्या अनावर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे. सदर वाहन व उपकरणांची खरेदी शासनाच्या प्रलचीत धोरणानुसार करण्यात यावी.

(२) सदर योजनेअंतर्गत आवश्यक असलेल्या मनुष्यबळासाठी (वाहन चालक कम मदतनीस), वाहन दुरुस्ती देखभाल, इंधन आणि औषधी खरेदीसाठी खालीलप्रमाणे एकूण रु ३.९४ कोटी एवढ्या आवर्ती खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

**आवर्ती खर्च**

| अ. क्र. | विवरण | संख्या | प्रती माह खर्च | एकूण किंमत प्रती वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | | (रक्कम रु. लक्षात) | |
| १ | वाहनचालक कम मदतनीस @रू.१५०००/- प्रती माह | ८० | १२.०० | १४४.०० |
| २ | वाहन दुरुस्ती देखभाल खर्च @ रू.६०००/- प्रती माह | ८० | ४.८० | ५७.६० |
| ३ | इंधन खरेदीसाठी खर्च @ रू. १०,०००/- प्रती माह | ८० | ८.०० | ९६.०० |
| ४ | औषधी खरेदीसाठी खर्च @ रू. १०,०००/- प्रती माह | ८० | ८.०० | ९६.०० |
| | | | एकूण | ३९३.६० |

(३) सदर पशुचिकित्सालयासाठी सेवानिवृत्त पशुवैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांची प्रचलीत धोरणानुसार मानधन तत्वावर नियुक्ती केल्यास, यावरील खर्च आयुक्त

पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडील मंजूर अनुदानातून करण्यात यावा.

८. सदर योजनेसाठी संबंधित जिल्ह्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त हे कार्यान्वयीन अधिकारी तसेच आहरण व संवितरण अधिकारी असतील. त्याचप्रमाणे संबंधित प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त हे प्रादेशिक स्तरावरील आणि आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे हे राज्यस्तरावरील सनियंत्रण अधिकारी राहतील.

९. सदर योजनेसाठी होणारा खर्च खाली नमूद केलेल्या लेखाशिर्षामधून भागविण्यात यावा.

मागणी क्र. डी - ४, २४०३, पशुसंवर्धन,
१०१ - पशुवैद्यकीय सेवा व पशुआरोग्य,
(०५) - पशुंच्या रोगांचे नियंत्रण,
(०५)(०१) - पशुंच्या रोगांचे नियंत्रण (अनिवार्य),
१० - कंत्राटी सेवा, १३- कार्यालयीन खर्च, २१- पुरवठा व सामुग्री,
२४ - पेट्रोल, तेल व वंगण, २८ - व्यावसायिक सेवा व प्रदाने, ५१ - मोटार वाहने,
संकेतांक - २४०३ ०१८७

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०२२५१२५३१६५७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Vijay K. Chaudhari
Date: 2019.02.26 12:05:51 +05'30'

**(विजय चौधरी)**
शासनाचे उप सचिव

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे- ०७.
३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र- १/२, मुंबई / नागपूर.
५. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
६. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
७. मा. राज्यमंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
८. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
९. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन,
१०.सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,
११.सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद
१२.वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१३.नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

१४.निवड नस्ती (पदुम- ३)

**(शासन निर्णय क्रमांक- पविआ -१०१७/प्र.क्र.८७/पदुम-३, दिनांक- २५ फेब्रुवारी, २०१९ चे सहपत्र)**

## परिशिष्ट - अ

### ८० तालुकानिहाय फिरत्या पशुचिकित्सा पथकांची यादी

| अ.क्र. | जिल्हा | अ.क्र. | तालुक्याचे नाव | प्रस्तावित फिरते पशुचिकित्सा पथक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **मुंबई विभाग** | | | |
| १. | ठाणे | १ | मुरबाड | फिरते पशुचिकित्सा पथक, मुरबाड |
| २. | पालघर | २ | मोखाडा | फिरते पशुचिकित्सा पथक, मोखाडा, |
| | | ३ | जव्हार | फिरते पशुचिकित्सा पथक , जव्हार, |
| | | ४ | वाडा | फिरते पशुचिकित्सा पथक, वाडा, |
| ३. | रायगड | ५ | श्रीवर्धन | फिरते पशुचिकित्सा पथक, श्रीवर्धन |
| | | ६ | रोहा | फिरते पशुचिकित्सा पथक, रोहा |
| ४. | रत्नागिरी | ७ | दापोली | फिरते पशुचिकित्सा पथक, दापोली |
| | | ८ | मंडणगड | फिरते पशुचिकित्सा पथक, मंडणगड |
| ५. | सिंधुदुर्ग | ९ | दोडामार्ग | फिरते पशुचिकित्सा पथक, दोडामार्ग |
| | **पुणे विभाग** | | | |
| ६. | पुणे | १० | जुन्नर | फिरते पशुचिकित्सा पथक, जुन्नर |
| | | ११ | मावळ | फिरते पशुचिकित्सा पथक, मावळ |
| | | १२ | वेल्हा | फिरते पशुचिकित्सा पथक, वेल्हा |
| | | १३ | भोर | फिरते पशुचिकित्सा पथक, भोर |
| ७. | सातारा | १४ | वाई | फिरते पशुचिकित्सा पथक, वाई |
| | | १५ | माण | फिरते पशुचिकित्सा पथक, माण |
| | | १६ | खटाव (वडूज) | फिरते पशुचिकित्सा पथक, खटाव (वडूज) |
| ८. | सांगली | १७ | कवठेमहांकाळ | फिरते पशुचिकित्सा पथक, कवठेमहांकाळ |
| | | १८ | जत | फिरते पशुचिकित्सा पथक, जत |
| | | १९ | आटपाडी | फिरते पशुचिकित्सा पथक, आटपाडी |
| ९. | सोलापूर | २० | माढा | फिरते पशुचिकित्सा पथक, माढा |
| | | २१ | सांगोला | फिरते पशुचिकित्सा पथक, सांगोला |
| १०. | कोल्हापूर | २२ | शिरोळ | फिरते पशुचिकित्सा पथक, शिरोळ |
| | | २३ | कागल | फिरते पशुचिकित्सा पथक, कागल |
| | | २४ | पन्हाळा | फिरते पशुचिकित्सा पथक, पन्हाळा |
| | **नाशिक विभाग** | | | |
| ११. | नाशिक | २५ | बागलान | फिरते पशुचिकित्सा पथक, बागलान |
| | | २६ | देवळा | फिरते पशुचिकित्सा पथक, देवळा |
| १२. | धुळे | २७ | शिरपुर | फिरते पशुचिकित्सा पथक, शिरपुर |
| १३. | नंदुरबार | २८ | अक्कलकुवा | फिरते पशुचिकित्सा पथक, अक्कलकुवा |
| | | २९ | धडगांव | फिरते पशुचिकित्सा पथक, धडगांव |

| १ | २ | ४ | ३ | ५ |
|---|---|---|---|---|
| १४. | अहमदनगर | ३० | कर्जत | फिरते पशुचिकित्सा पथक, कर्जत |
| | | ३१ | श्रीगोंदा | फिरते पशुचिकित्सा पथक, श्रीगोंदा |
| | | ३२ | नेवासा | फिरते पशुचिकित्सा पथक, नेवासा |
| | **औरंगाबाद विभाग** | | | |
| १५. | औरंगाबाद | ३३ | फुलंब्री | फिरते पशुचिकित्सा पथक,फुलंब्री |
| | | ३४ | सिल्लोड | फिरते पशुचिकित्सा पथक, सिल्लोड |
| | | ३५ | सोयगांव | फिरते पशुचिकित्सा पथक, सोयगांव |
| १६. | परभणी | ३६ | सेलू | फिरते पशुचिकित्सा पथक, सेलू |
| | | ३७ | पुर्णा | फिरते पशुचिकित्सा पथक, पुर्णा |
| १७. | जालना | ३८ | भोकरदन | फिरते पशुचिकित्सा पथक, भोकरदन |
| | | ३९ | घनसावंगी | फिरते पशुचिकित्सा पथक, घनसावंगी |
| | | ४० | जालना | फिरते पशुचिकित्सा पथक, जालना |
| १८. | बीड | ४१ | वडवणी | फिरते पशुचिकित्सा पथक, वडवणी |
| | **लातूर विभाग** | | | |
| १९. | लातूर | ४२ | निलंगा, | फिरते पशुचिकित्सा पथक, निलंगा, |
| | | ४३ | देवणी | फिरते पशुचिकित्सा पथक, देवणी |
| | | ४४ | जळकोट | फिरते पशुचिकित्सा पथक, जळकोट |
| २०. | नांदेड | ४५ | देगलूर | फिरते पशुचिकित्सा पथक, देगलूर |
| | | ४६ | भोकर | फिरते पशुचिकित्सा पथक, भोकर |
| | | ४७ | बिलोली | फिरते पशुचिकित्सा पथक, बिलोली |
| २१. | हिंगोली | ४८ | हिंगोली | फिरते पशुचिकित्सा पथक, हिंगोली |
| २२. | उस्मानाबाद | ४९ | भूम | फिरते पशुचिकित्सा पथक, भूम |
| | | ५० | कळंब | फिरते पशुचिकित्सा पथक, कळंब |
| | **अमरावती विभाग** | | | |
| २३. | अमरावती | ५१ | अचलपूर | फिरते पशुचिकित्सा पथक, अचलपूर |
| | | ५२ | अंजनगांव सुर्जी | फिरते पशुचिकित्सा पथक, अंजनगांव सुर्जी |
| २४. | अकोला | ५३ | अकोट | फिरते पशुचिकित्सा पथक, अकोट |
| | | ५४ | बार्शी-टाकळी | फिरते पशुचिकित्सा पथक, बार्शी-टाकळी |
| २५. | बुलढाणा | ५५ | सिंदखेडराजा | फिरते पशुचिकित्सा पथक, सिंदखेडराजा |
| | **नागपूर विभाग** | | | |
| २६. | नागपूर | ५६ | नरखेड | फिरते पशुचिकित्सा पथक, नरखेड |
| | | ५७ | पारशिवनी | फिरते पशुचिकित्सा पथक, पारशिवनी |
| २७. | भंडारा | ५८ | तूमसर | फिरते पशुचिकित्सा पथक, तूमसर |
| | | ५९ | मोहाडी | फिरते पशुचिकित्सा पथक, मोहाडी |
| | | ६० | पवनी | फिरते पशुचिकित्सा पथक, पवनी |

| १ | २ | ४ | ३ | ५ |
|---|---|---|---|---|
| २८. | गोंदिया | ६१ | तिरोडा | फिरते पशुचिकित्सा पथक, तिरोडा |
| | | ६२ | अर्जूनी मोरगांव | फिरते पशुचिकित्सा पथक, अर्जूनी मोरगांव |
| | | ६३ | आमगांव | फिरते पशुचिकित्सा पथक, आमगांव |
| | | ६४ | सालेकसा | फिरते पशुचिकित्सा पथक, सालेकसा |
| | | ६५ | गोरेगांव | फिरते पशुचिकित्सा पथक, गोरेगांव |
| २९. | गडचिरोली | ६६ | मुलचेरा | फिरते पशुचिकित्सा पथक, मुलचेरा |
| | | ६७ | एटापल्ली | फिरते पशुचिकित्सा पथक, एटापल्ली |
| | | ६८ | भामरागड | फिरते पशुचिकित्सा पथक, भामरागड |
| | | ६९ | कोरची | फिरते पशुचिकित्सा पथक, कोरची |
| ३०. | वर्धा | ७० | कारंजा | फिरते पशुचिकित्सा पथक, कारंजा |
| | | ७१ | आर्वी | फिरते पशुचिकित्सा पथक, आर्वी |
| ३१. | चंद्रपूर | ७२ | राजुरा | फिरते पशुचिकित्सा पथक, राजुरा |
| | | ७३ | सिंदेवाही | फिरते पशुचिकित्सा पथक, सिंदेवाही |
| | | ७४ | जिवती | फिरते पशुचिकित्सा पथक, जिवती |
| | | ७५ | पोंभुर्णा | फिरते पशुचिकित्सा पथक, पोंभुर्णा |
| | | ७६ | चंद्रपूर | फिरते पशुचिकित्सा पथक, चंद्रपूर |
| | | ७७ | भद्रावती | फिरते पशुचिकित्सा पथक, भद्रावती |
| | | ७८ | बल्लारपूर | फिरते पशुचिकित्सा पथक, बल्लारपूर |
| | | ७९ | सावली | फिरते पशुचिकित्सा पथक, सावली |
| | | ८० | मूल | फिरते पशुचिकित्सा पथक, मूल |

***

**(शासन निर्णय क्रमांक- पविआ -१०१७/प्र.क्र.८७/पदुम-३, दिनांक- २५ फेब्रुवारी, २०१९ चे सहपत्र)**

## परिशिष्ट - ब

## पशुवैद्यकीय सेवांचा तपशील

**(अ) प्रसुतीसंबंधी सेवा:-**

(१) वंध्यत्व - निदान व उपचार

(२) अवघड किंवा मंद गतीने प्रसुती, योनी व गर्भाश्यातून अवयव किंवा त्याचा भाग बाहेर येणे, जनावरांचे रेक्टम बाहेर येणे इ.

(३) सुकलेला गर्भ, मृत गर्भ बाहेर काढणे.

(४) शस्त्रकियेव्दारे प्रसुती

**(ब) प्रथमोपचार सेवा**

**(क) तातडीच्या चिकित्सकीय सेवा:-**

(१) मिल्क फिवर, केटोसीस इ. सारखे चयापयय विकार

(२) संसर्गजन्य विकार

(३) प्रोटोझोन विकार

(४) अन्न विषबाधा, आम्लाचे उपचन, पोट फुगणे, अतिसार

(५) ऑस्गॅनो फॉस्फरस विषबाधा

(६) वनस्पतीजन्य विषबाधा

(७) सर्पदंश/ किटकाचा चावा

(८) ॲलर्जी

(९) पक्षाघात

**(ड) शस्त्रक्रिया सेवा :-**

(१) दुखापत

(२) गळू

(३) जखम

(४) अस्थीभंग

(५) शेपूट व शिंगाचे विच्छेदन

(६) रुमेनोटॉमी, डोळ्यांचा कर्करोग

(७) स्ट्रिंग हॉल्ट इत्यादी.

**(इ) इतर कोणत्याही चिकित्सकीय आपातकालीन परिस्थितीत पुरविण्यात येणाऱ्या सेवा**

***

**(शासन निर्णय क्रमांक- पविआ -१०१७/प्र.क्र.८७/पदुम-३, दिनांक- २५ फेब्रुवारी, २०१९ चे सहपत्र)**

## परिशिष्ट - क

## पशुवैद्यकीय अधिकारी / कर्मचारी तसेच वाहन चालक *तथा* मदतनीस यांची कर्तव्ये व <u>जबाबदाऱ्या</u>

### (अ) पशुवैद्यकीय अधिकारी

(१) फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या संचाचे (बेसीक केअर) नेतृत्व करणे

(२) आजारी असलेल्या प्राण्याला प्रथमोपचार देणे.

(३) आजारी प्राण्यावर आवश्यक उपचार करणे.

(४) भेट आणि देखभाल केलेल्या पशुधनाची व्हेटरीनरी केअर रेकॉर्डस फॉर्ममध्ये दस्तावेजीकरणे केल्याची खात्री करणे.

(५) उपकरणांची देखभाल, फिरत्या दवाखान्याची स्वच्छता याबाबत आवश्यक ती कार्यवाही करणे

(६) औषधांच्या साठ्याची नोंद ठेवणे

### (ब) वाहन चालक कम मदतनीस

(१) वाहन चालविणे व वाहनाची वेळच्या वेळी देखभाल करुन, वाहन सुस्थितीत राहील याची काळजी घेणे.

(२) पशुवैद्यकाच्या मार्गदर्शनाखाली औषधोपचारासाठी पशुधनास पकडणे आणि हाताळण्यासाठी पशुवैद्यकीय अधिकाऱ्यास मदत करणे.

(३) पशुवैद्यकीय अधिकारी यांना पशुउपचारासाठी / पशुंच्या तपासणीसाठी सहाय्य करणे.

***

शासकीय/ निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे ....

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १७ डिसेंबर, २०१६

वाचा : शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३
दि. ८ जानेवारी, २०१६ व दि. २ मार्च, २०१६

**प्रस्तावना :-**

सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन करार पद्धतीने घेण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला असून त्याबाबतचा शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. ८.१.२०१६ रोजी निर्गमित करण्यात आलेला आहे. दि.२ मार्च २०१६ च्या शासन निर्णयानुसार पॅनलला (सूचीला) मान्यता देणे आणि नियुक्ती करणेबाबतचे अधिकार विभागप्रमुखांना प्रदान करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागांस देण्यात आलेले आहेत.

उक्त शासन निर्णयातील तरतुदींनुसार कंत्राटी तत्वावर नेमण्यात येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या मासिक पारिश्रमिकाची परिगणना करताना अडचणी उद्भवत असल्याने त्यामध्ये योग्य ती सुधारणा करणे; त्याचप्रमाणे काही मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे यांना उक्त शासन निर्णयातील तरतूदी शिथिल करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय -**

१. दि.८.१.२०१६ व दि. २.३.२०१६ हे दोन्ही शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत असून खालीलप्रमाणे सर्वसमावेशक निर्णय घेण्यात येत आहे.

२. प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध विषयांसंदर्भात **"विवक्षित सेवा/कामांसाठी" विषयनिहाय एमपॅनलमेंट (Empanelment) करुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने उपलब्ध करुन घेता येतील. उदा.** आस्थापनाविषयक बाबी/ सेवाप्रवेश नियम, पायाभूत सुविधा निर्मिती, नागरी सेवा पुरविणे, विशेष गुप्त वार्ता, योजनांचे मूल्यमापन इत्यादी, *आवश्यकतेप्रमाणे इतर विवक्षित सेवा/कामांचा यामध्ये समावेश करता येईल.* त्याकरिता पुढीलप्रमाणे कार्यपद्धती विहीत करण्यात येत आहे -

**अ) निवडप्रक्रिया व नियुक्ती -**

१) **नामिकासूची** (Panel) - करार पध्दतीने "विवक्षित कामांसाठी" नेमणूका करताना पारदर्शक पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. विहीत पद्धतीने जाहिरात देऊन "विवक्षित कामांसाठी" पात्र सेवानिवृत्त अधिकाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात यावेत. जाहीरातीमध्ये नामिकासूचीत नियुक्त करावयाच्या एकूण व्यक्तिंची संख्या, विवक्षित कामाचे स्वरुप, कालावधी आणि देय मासिक पारिश्रामिक ( शासन निर्णयातील ड (१) (क) च्या अनुषंगाने)

यांचा उल्लेख करण्यात यावा आणि प्राप्त अर्जातून पात्र उमेदवाराची निवड करुन नामिकासूची (Panel) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांनी तयार करावी.

२) **नामिकासूचीची (Panel) वैधता** - सदर नामिकासूचीतील व्यक्तिंमधूनच करार पध्दतीने नियुक्ती करण्यात यावी. सदर नामिकासूचीची वैधता जास्तीत जास्त ३ वर्षे राहील तसेच त्या सूचीचा वार्षिक आढावा घेण्यात यावा.

३) **एमपॅनलमेंटचा कालावधी** - विवक्षित कामाचे स्वरुप आणि व्याप्ती विचारात घेऊन ते काम पूर्ण करण्याचा कालावधी सक्षम प्राधिकारी यांनी निश्चित करावा.

४) **बंधपत्र/हमीपत्र** - नियुक्तीच्या कालावधीत करार पद्धतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील या आशयाचे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्यांकडून घेण्यात यावे. तसेच सदर बंधपत्रात/हमीपत्रात, करार पद्धतीने नियुक्ती देताना शासनाने या निर्णयान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, विभागाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा, तसेच करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही, याचा उल्लेख करण्यात यावा.

५) **नियुक्ती आदेश** - नामिकासूचीतील व्यक्तीकडून बंधपत्र प्राप्त झाल्यानंतर करार पद्धतीने नियुक्ती देण्याबाबतच्या आदेशांमध्ये “एमपॅनलमेंटचा विषय”, “विवक्षित स्वरुपाचे काम” आणि ते काम पूर्ण करण्यासाठी अपेक्षित असलेल्या कालावधीचा स्पष्टपणे उल्लेख करुन सक्षम प्राधिकारी यांनी नियुक्ती आदेश काढावेत.

६) **करार पद्धतीने नियुक्ती द्यावयाच्या व्यक्तिंची संख्या** - करार पध्दतीने नियुक्ती देताना कार्यालयातील/आस्थापनेवरील एकूण मंजूर पदसंख्येच्या जास्तीत जास्त १० % इतके अधिकाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देता येईल. करार पद्धतीने नियुक्त्या करण्याचे प्रस्ताव तयार करताना कामाचे स्वरुप, आकस्मिकता, सार्वजनिक हित इ. बाबी विचारात घेण्यात याव्यात.

७) **करार पद्धतीने नियुक्तीची कालमर्यादा** - सदर कामासाठी करार पद्धतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात यावी. परंतु अशा नियुक्तीचे आवश्यकतेनुसार वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नूतनीकरण करता येईल. मात्र, एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

८) **वयोमर्यादा** - करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील. तथापि, ज्या व्यक्तिंच्या सेवा त्यानंतर चालू ठेवणे आवश्यक आहे, असे मत असेल त्यांच्या सेवा सक्षम प्राधिकाऱ्यास एकस्तर वरीष्ठ अधिकाऱ्याच्या/प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने पुढे चालू ठेवता येतील मात्र, कोणत्याही परिस्थितीत करार पद्धतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ७० व्या वर्षापर्यंतच कार्यरत राहू शकतील.

९) **सक्षम प्राधिकारी** -

(१) गट-अ (ग्रेड पे रु. ७६००/- किंवा अधिक) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार शासनास असतील.

(२) गट-अ ( ग्रेड पे रु. ७६००/- पेक्षा कमी) संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम ९(२२) नुसार घोषित करण्यात आलेल्या विभाग प्रमुखांना (Head of the Department) असतील.

(३) गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) या संवर्गीय सेवेमधून सेवानिवृत्त अधिकारी यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्याचे अधिकार प्रादेशिक प्रमुखांना (Regional Heads) असतील.

(४) गट-क व गट-ड संवर्गातून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना करार पद्धतीने नियुक्ती देण्यात येऊ नये.

**ब) अर्हता व अनुभव -**

**१)** विवक्षित कामासाठी लागणारी विशेष अर्हता अथवा संबंधित कामाचा किमान तीन वर्षांचा अनुभव ही पूर्वअट ठेवण्यात यावी.

२) करार पद्धतीने नियुक्त करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) करार पद्धतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुद्ध कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

**क) नियमित मंजूर पदे**

१) सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची करार (Contractual) पद्धतीने करण्यात येणारी नियुक्ती ही **नियमित** स्वरुपाच्या कामकाजासाठी न करता केवळ **विवक्षित** कामासाठीच करण्यात यावी.

२) नियमित मंजूर पदांवर (Sanctioned Posts) करार पद्धतीने नियुक्ती करता येणार नाही, अशी पदे सेवाप्रवेश नियमानुसार विहीत केलेल्या मार्गाने नियमितपणे भरण्यात यावीत.

३) करार पद्धतीने नियुक्तीमुळे शासन सेवेत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या पदोन्नतीच्या संधीवर प्रतिकूल परिणाम होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

**ड) मासिक पारिश्रमिक व भत्ते -**

१) **मासिक पारिश्रमिक** -

**(क) शासकीय / निमशासकीय सेवा** - सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची विहीत कार्यपद्धतीचे पालन करुन करार पद्धतीने नेमणूक करतांना त्यांना अशा नियुक्तीच्या वेळी महागाई भत्त्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात यावे आणि एकदा निश्चित करण्यात आलेले पारिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी (जास्तीत जास्त ३ वर्षे) कायम राहील.

*(तथापि, वेतनासाठी शासनाकडून अनुदान मिळत नसलेल्या शासकीय उपक्रम, महामंडळे, मंडळे, संविधिक संस्था यांच्याबाबतीत वरीलप्रमाणे निश्चित*

*होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाची रक्कम वाढविण्याचे अधिकार संबंधित शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे यांच्या संचालक मंडळास आणि संविधिक संस्थेच्या प्रमुखास/अध्यक्षास राहतील.)*

**(ख) निवृत्तीवेतनार्ह नसलेल्या निमशासकीय सेवा** - ज्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा निवृत्तीवेतनार्ह नाहीत त्यांना करार पद्धतीने नियुक्त करताना, सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या वेतनाच्या आधारे त्यांची मानीव निवृत्तीवेतनाची रक्कम आणि त्यावर प्रचलित दराने महागाई भत्त्याची रक्कम केवळ हिशेबासाठी परिगणित करुन त्या आधारे त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात यावे.

**२) भत्ते** - उक्त तरतुदीनुसार निश्चित होणाऱ्या मासिक पारिश्रमिकाच्या "जास्तीत जास्त २५ %" इतक्या मर्यादेपर्यंत एकमुस्त रक्कम "निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह अनुज्ञेय असेल. सदर रक्कम नियुक्त करावयाच्या अधिकारी/कर्मचारी यांची कार्यक्षमता, कार्यकुशलता, त्यांना पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा इ. बाबी विचारात घेऊन निश्चित करण्यात यावी.

*(मासिक पारिश्रमिक व भत्त्यांची परिगणना करण्याबाबतचे मार्गदर्शनपर उदाहरण या शासन निर्णया सोबतच्या "परिशिष्ट-अ" येथे उद्धृत करण्यात आली आहेत.)*

**३) प्रवासभत्ता व दैनिक भत्ता** - करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

**४)** करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे अशा व्यक्तींना अनुज्ञेय होणाऱ्या पारिश्रमिकाचा कोणताही परिणाम त्यांना प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतन व महागाई भत्ता यावर होणार नाही.

**५)** करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तिंच्या पारिश्रमिकापोटी व भत्यांपोटी होणारा खर्च संबंधित कार्यालयाच्या "कार्यालयीन खर्च" या शिर्षाखाली उपलब्ध असलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

**इ) इतर अटी व शर्ती -**

१) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे /सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार/ हक्क नसेल.

२) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्यांच्या करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

३) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यावसायिक कामात गुंतलेला नसावी.

४) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (conflict of interest) जाहीर करणे आवश्यक राहील.

५) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

६) करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत नियुक्तीसाठी सक्षम असलेले प्राधिकारी वेळावेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.

३. करार पद्धतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

४. करार पध्दतीने नियुक्ती करताना सामान्य प्रशासन विभाग आणि वित्त विभागाच्या सहमतीची आवश्यकता असणार नाही.

५. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त / स्वेच्छा सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ, पुनर्नियुक्ती देण्यात येऊ नये.

६. हा शासन निर्णय सर्व शासकीय कार्यालये, शासकीय उपक्रम, संविधिक संस्था, मंडळे/महामंडळे आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांना लागू राहील.

७. शासन निर्णय दि. ०८.०१.२०१६ व दि. ०२.०३.२०१६ मधील तरतुदीनुसार करार पध्दतीने करण्यात आलेल्या नियुक्त्यांना देखील **या शासन निर्णयातील तरतूदी सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू होतील.**

८. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्रमांक : अनौ. सं. क्र. ७७१/ १६/व्यय-४ दिनांक ३.१२.२०१६ नुसार दिलेल्या सहमतीन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१६१२१७१७१८२४१३०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Mukesh Khullar

Digitally signed by Mukesh Khullar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6481e097db98eaae8b058013054 4ebced12d1340cea24fcd0132235fb0c544a 8, cn=Mukesh Khullar
Date: 2016.12.17 17:51:18 +05'30'

**( मुकेश खुल्लर )**

**प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई, (५ प्रती)
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, (५ प्रती)
३) सर्व.मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद/विधान सभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५) सर्व विधान सभा/विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ
६) मा.अध्यक्ष,महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव
७) मा.सभापती,महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
८) मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
९) सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.

१०) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ,विधान भवन,मुंबई.
११) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१२) *प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
१३) *प्रबंधक, अपील शाखा, उच्च न्यायालय, मुंबई /नागपूर/औरंगाबाद खंडपीठ
१४) *प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
१५) *राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१६) *सचिव, राज्य माहिती आयोग,मुंबई.
१७) *महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखापरीक्षा/ लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
१८) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई
१९) विभागीय आयुक्त (सर्व)
२०) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे)
२१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा (सर्व)
२२) सर्व मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभाग प्रमुख
२३) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना)
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२५) निवडनस्ती, कार्यासन-१३, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

**पत्राने*

**शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७ डिसेंबर, २०१६ सोबतचे परिशिष्ट-अ**

**मासिक पारिश्रमिकाची व भत्यांची परिगणना करण्याबाबतचे उदाहरण**

| मुद्दा | उदा. क्र. १ |
|---|---|
| निवृत्तीचा दिनांक | दि.३०.११.२०१३ |
| निश्चित झालेले मूळ निवृत्तीवेतन | रु.२५,३०० |
| अंशराशीकृत मुल्य | रु. १०,१२० |
| करार पद्धतीने नियुक्तीचा दिनांक | दि.१५.९.२०१६ |
| नियुक्तीच्या वेळी देय असलेल्या निवृत्तीवेतनाची रक्कम | रु.१५,१८० |
| नियुक्तीच्या वेळी प्राप्त होणाऱ्या निवृत्तीवेतनाची रक्कम + महागाई भत्ता | रु.१५,१८० + रु. ३१,६२५ (माहे नोव्हेंबर, २०१६ @ १२५%)<br>एकूण रु. ४६,८०५ |
| मासिक पारिश्रमिकाची रक्कम (शासकीय सेवा व निमशासकीय सेवा) | रु. ४६,८०० #<br>{शंभरात रुपांतरीत} |
| निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता" या सर्व भत्त्यांपोटी प्रतिमाह कमाल अनुज्ञेय रक्कम (मासिक पारिश्रमिकाच्या २५ %) | रु. ११,७०० *<br>** जास्तीत जास्त* |
| एकूण | रु. ५८,५०० *<br>** जास्तीत जास्त* |

# तथापि, वेतनासाठी शासनाकडून अनुदान मिळत नसलेल्या शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे/संविधिक संस्था यांच्याबाबतीत सदर पारिश्रमिकाची रक्कम वाढविण्याचे अधिकार संबंधित शासकीय उपक्रम/ महामंडळे/ मंडळे यांच्या संचालक मंडळास आणि संविधिक संस्थेच्या प्रमुखास/अध्यक्षास राहतील.

****